Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

Date: 04/10/2025

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

### News Paper Name: आपलं महानगर

**Page No. 04**

आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# दिनविशेष

## शास्त्रीय गायिका सरस्वतीबाई राणे



सरस्वतीबाई राणे या हिंदुस्थानी शास्त्रीय शैलीतील भारतीय शास्त्रीय गायिका होत्या. त्यांचा जन्म ४ ऑक्टोबर १९१३ रोजी मिरज शहरात झाला. किराणा घराण्याचे संस्थापक उस्ताद अब्दुल करीम खान यांची ती मुलगी होती. त्यांच्या कुटुंबाला दीर्घ आणि उत्तम संगीत परंपरा होती. त्यांनी संगीताचे प्रारंभिक प्रशिक्षण तिचे मोठे भाऊ सुरेशबाबू माने आणि मोठी बहीण हिराबाई बडोदेकर यांच्याकडून घेतले. जे स्वत: त्यांच्या काळातील भारतीय शास्त्रीय संगीताचे नायक होते. नंतर तिने मोठी बहीण हिराबाई बडोदेकर यांच्यासोबत विशेषत: जुगलबंदी शैलीत गायन केले. 'संगीत संशयकल्लोळ', 'सौभद्र', 'एकच प्याला'तील त्यांच्या भूमिका व 'ललना मना' सारखी पदे गाजली. 'पायाची दासी', 'पैसा बोलतो आहे', 'भरतभेट', 'सरगम', 'शहेनशहा अकबर' ही त्यातील काही चित्रपटांची ठळक नावे. आचार्य अत्र्यांच्या बऱ्याच चित्रपटांतून त्या गायिल्या आहेत. 'अंगणात फुलल्या जाई जुई' हे त्यांचे गाणे खूप गाजले. 'रामराज्य'मधील 'बीना मधुर मधुर कछु बोल' हे त्यांचे सर्वांत गाजलेले गीत होय.

सरस्वतीबाईच्या सुरेलपणामुळे त्यांनी अनेक बोलपटांत प्रभावी, उत्तम पार्श्वगायन केले. त्या काळात सरस्वतीबाई पार्श्वगायनात आघाडीच्या गायिका होत्या. नंतर १९७० मध्ये श्याम बेनेगलांच्या 'भूमिका' सिनेमात नात मीना फातर्पेकरांबरोबर त्यांनी शुद्ध कल्याणची बंदिश गायिली. त्यांचे रागदारी, भावगीत, चित्रपटगीत अशा सर्व प्रकारांचे ध्वनिमुद्रण निघाले आणि गाजलेही. ग.दि. माडगूळकर व सुधीर फडके यांचे 'घनश्याम नयनी आला' हे सरस्वतीबाईंनी अप्रतिम गायिलेले गीत प्रचंड गाजले. त्यांना 'बालगंधर्व' पुरस्कार, 'जीवन गौरव' पुरस्कार, 'यशवंतराव चव्हाण' पुरस्कार, उ. फैजाझ अहमद खाँ स्मृती ट्रस्टचा 'किराणा घराणा सन्मान' देऊन गौरविण्यात आले. सरस्वतीबाई राणे यांचे १० ऑक्टोबर २००६ रोजी मुंबईत निधन झाले.

Nashik Edition
Oct 04, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401